प्रकरण चार :

# हमाल संघटना, कार्याची रुपरेखा

## प्रकरण चौथे

## हमाल संघटना कार्याची रूपरेषा

हमाल हा असंघटित क्षेत्रातील असंरक्षित कामगार आहे. संघटित क्षेत्रातील कामगारांच्या तुलनेत काम व वेतन याबाबतच्या अनेक समस्या हमालांसमोर असतात. त्यांच्या कामाचे स्वरूप निश्चित नसते. कामाची शाश्वती नसते. संघटित कामगारांप्रमाणे मासिक वेतन ठरलेले नसते. कामावर आधारीत वेतन असे स्वरूप असलेने मासिक वेतनाची हमी देता येत नाही. वेतनाबाबत निश्चित नियम नसलेने कामावर घेताना अल्पवेतनावर राबवून घेतले जाते अथवा बरीच कामे विनावेतन करून घेतली जातात. त्यांच्या कामाची वेळ अनियंत्रित असते. पूर्णत: मालाच्या आवक-जावक होणाऱ्या वेळेवर कामाची वेळ अवलंबून असते. संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे पगारी सुट्टी, पगारी रजा या सुविधा त्यांना उपलब्ध नाहीत. शारीरिक कष्टाचे काम हमाल करतात. त्यातून शारीरिक इजेचा संभव असतो. परंतु नुकसान भरपाईचे निश्चीत आश्वासन नसते. तसेच पगारी आजारी रजा त्यांना मिळू शकत नाही. उतारवयामध्ये हमाल काम करू शकत नाही. परंतु संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे भविष्यनिर्वाहनिधी व निवृत्तीवेतन त्यांना मिळू शकत नाही. महागाईचा वाढता दर लक्षात घेता वार्षिक वेतनवाढ हमालांना मिळत नाही. कामाच्या ठिकाणी विश्रांतिगृहे, स्वच्छतागृह तसेच प्राथमिक औषधोपचार या सुविधा हमालांना पुरविल्या जात नाहीत. तसेच संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे अडचणीच्या वेळी आकस्मिक निधी कर्जाऊ रूपाने मिळण्याची सोय हमालांना उपलब्ध नाही. सर्वात महत्वाची समस्या म्हणजे त्यांचे काम कायम स्वरूपी नसलेने अथवा

प्रासंगिक स्वरूपाचे असलेने व्यवसाय सुरक्षितता नसते.

या सर्व समस्यांचे निराकरण व्यक्तिगत पातळीवर करण्यास हमाल असमर्थ असतो. त्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असते. परंतु निरक्षर, अज्ञान व आर्थिक न्यूनगंडाने पछाडलेल्या हमालांची संघटना बांधणे व टिकवून ठेवणे ही अवघड गोष्ट आहे. पण पुण्यासारख्या औद्योगिक-व्यापारी शहरामध्ये डॉ. बाबा आढावांसारख्या प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली "हमाल पंचायत" नावाची संघटना उभी राहिली. हमालांचे काम व वेतनाचे प्रश्न या संघटनेने सोडविण्यात ब-याच अंशी यश मिळविले. संघटनेच्या माध्यमातून विधायक उपक्रम व प्रबोधन करून हमालांना आत्मविश्वास मिळवून दिला. या सर्वामागे संघटित शक्तीची ताकदच प्रभावी ठरली. या अनुषंगानेच कोल्हापूर शहरामध्ये अस्तित्वात असलेल्या संघटना, त्यांची वाटचाल जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पाहणीपैकी ९२ टक्के हमाल संघटनांचे सभासद आहेत. परंतु संघटनेविषयी हमालांच्या प्रतिक्रिया भिन्न आहेत. निम्म्या हमालांना संघटनेचे कार्य माहित नाही, किंबहुना संघटना निष्क्रिय आहे असा सूर होता. तर काही हमालांनी संघटनेमुळे दरवाढ व वेळेच्या बाबतीत सुधारणा होऊ शकली असे सांगितले. तसेच संघटनेमुळे तक्रार निवारण होते असेही सांगितले. परंतु हमालांच्या संघटनेकडून अधिक अपेक्षा आहेत. कोल्हापूर शहरामध्ये हमालांच्या तीन संघटना आहेत. : [१] कोल्हापूर जिल्हा माथाडी कामगार युनियन [२] कोल्हापूर जिल्हा हमाल संघ व [३] हमाल पंचायत या तीन संघटना सध्या कोल्हापूरमध्ये कार्यरत आहेत. या संघटनेच्या पदाधिका-यांना भेटून संघटनेची स्थापना, संघटनेची वाटचाल, काम व वेतनबाबतचे संघटनेचे प्रयत्न व व्यापा-यांचे धोरण, राबविलेले विधायक

उपक्रम, हमालांच्या समस्या व भावी धोरण आणि उपक्रम याविषयी चर्चा केली, तसेच, माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या यंत्रणेविषयी तेथील प्रशासकीय अधिका-यांशी चर्चा केली. यामधून आढळलेल्या बाबी पुढील प्रमाणे -

[१] कोल्हापूर जिल्हा माथाडी कामगार युनियन -

संघटनेचे अध्यक्ष श्री. के. एस्. चव्हाण यांनी संघटनेविषयी पुढील माहिती दिली.

स्थापना :-

कोल्हापूर जिल्हा माथाडी कामगार युनियनची स्थापना १९५७ साली झाली. गूळ विभाग, शेंग - खरेदी विभाग व मध्यवर्ती शासकीय गु दामातील हमाल संघटना सभासद आहेत. त्याचबरोबर तोलाईदार [हमालांच्या रोजच्या कामाची नोंद ठेवणारे मंडळाने नेमलेले कामगार] यांचाही समावेश आहे. संघटना उभारणीमध्ये अडचणी आल्या नाहीत. परंतु संघटनेमध्ये हमाल सभासद कमी होते. तोलाईदारांचा प्रभाव होता. निरक्षरता, अज्ञान व मालकांची भीती यामुळे हमाल सभासद होण्यास तयार नसत. परंतु संघटनेचे महत्त्व पटवून दिल्यानंतर हमाल सभासद झाले. आज ४०० सभासद आहेत.

संघटना कार्य :-

संघटनेच्या माध्यमातून हमालांसाठी "माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे कल्याण व नियमन]" हा कायदा लागू होणे-

साठी १९७८ ते १९८५ अखेर विविध मार्गांनी प्रयत्न झाले. संप, मोर्चे इ. चा अवलंब केला. प्रसंगी व्यापारी, दलाल, मार्केट कमिटी यांनी हे आंदोलन मोडण्याचा प्रयत्न केला. परंतु संघटना यशस्वी ठरली. १९८५ साली कोल्हापूर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना झाली. व्यापारी, मार्केट कमिटी, संघटना यांचे प्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांच्यामध्ये करार होऊन २५ टक्के लेव्ही व्यापा-यांनी मंडळाकडे भरणेविषयी व दरवाढ प्रत्येक तीन वर्षानंतर करण्याचे ठरले. दरवाढीविषयी संघटनेचे मत भिन्न आहे. दरवाढ करताना व्यापारी, मालक संघटनेशी चर्चा करत नाहीत, परंतु दरवाढ शासन नियमानेच दिली जाते. आज गूळाचे उत्पादन कमी झालेने काम कमी मिळते. त्याचा परिणाम वेतनावर होतो. मात्र दरवाढ १ वर्षानी दिली जावी हे संघटना पदाधिका-यांचे आग्रही मत आहे.

हमाल-मालक यासंदर्भात त्यांचे मत जाणून घेता, हमाल व मालक यांच्या कोणात्याच तक्रारी संघटनेकडे येत नाहीत. कामे परस्पर समजुतीने करण्यावर भर दिला जातो. कामाच्या वेळेच्या बाबतीत संघटना फारसे प्रयत्न करु शकली नाही. कारण गूळाची आवक होण्याच्या वेळेवर कामाची वेळ अवलंबून असते. काम व वेतन ही हमालांची गरज असलेने हमालसुद्धा तक्रार करु शकत नाहीत, असे त्यांचे मत आहे.

संघटनेचे विधायक उपक्रम :-

आर्थिक दारिद्र्य व निरक्षरता या हमलांच्या प्रमुख समस्या असून त्या अनुषंगाने संघटनेने पतसंस्थेच्या माध्यमातून लग्न कार्य व इतर अडचणींसाठी सभासदांना कर्जपुरवठा केला आहे. परंतु याचा अधिक

फायदा तोलाईदारांना झाल्याचे किंबहुना त्यांनी घेतल्याचे दिसून आले. कर्ज फेडण्याची ताकद हमालांमध्ये नसलेने हमाल कर्जप्रकरण टाळतात. तसेच साक्षरतेसाठी व्याख्यानांच्या माध्यमातून हमालांना प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला, परंतु, त्यात फारसे यश आले नाही.

संघटनेचे भावी धोरण व उपक्रम :-

निवासव्यवस्था ही हमालांची मुख्य समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून संघटनेचा भावी प्रकल्प हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या माध्यमातून राबविण्याचा मानस आहे. ज्यांचा भविष्य-निर्वाहनिधी २० हजार रूपयांवरती जमा झालेला आहे त्यांना मंडळ ६० हजार रूपये कर्ज रूपाने देऊ शकते. या तरतुदीचा अवलंब करून हमालांचा निवासाचा प्रश्न सोडविण्याचा संघटनेचा भावी उपक्रम आहे. काम व वेतन याबाबतीत मात्र संघटनेचे निश्चित असे भावी धोरण नाही.

[२] कोल्हापूर जिल्हा हमाल संघ :-

संघटनेचे अध्यक्ष श्री. एम. एस. देसाई यांनी संघटनेविषयी पुढील माहिती दिली.

स्थापना -

भारतीय मजदूर संघ प्रणित कोल्हापूर जिल्हा हमाल संघाची स्थापना १९७२ साली झाली. वाहतूक विभाग व धान्यबाजारामधील हमाल या संघटनेचे सभासद आहेत. प्रथम ७० सभासद होते. हमालांमधील

आर्थिक दारिद्र्यामुळे आलेली मनोदुर्बलता, मालकांचा दबाव यामुळे संघटना उभारणी जलद होऊ शकली नाही. परंतु हमाल व संघटना यांच्या पुढाकाराने संघटना वाटचाल करु शकली. आज संघटनेचे ४०० सभासद आहेत.

## संघटना कार्य :-

वेतनवाढीच्या संदर्भात मालक, संघटना प्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांच्यात झालेल्या करारानुसार वेतनवाढ [दरवाढ] तीन वर्षांनी केली जाते. दरवाढ करताना मालक, संघटना प्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांच्या चर्चेतून ठरविली जाते. यासाठी १९८६ साली वेतनवाढीसाठी संघटनेने २५ दिवसांचा संप केला होता. मालकांकडून संपफोडीचे प्रयत्न झाले. अखेर तडजोडीतून ४० टक्के दरवाढ झाली. प्रत्यक्षात संघटनेची मागणी ८० टक्के होती. त्यामुळे संघटनेचे यश संमिश्र आहे. दरवाढ वर्षाला दिली जावी. तसेच, दरवाढ करताना महागाईचा दर व होणारे काम यांना अनुसरून केली जावी अशी संघटनेची मागणी आहे.

मालक-संघटना परस्परसंबंधाचा आढावा घेता असे आढळले की, एखादया हमालास कामावरून कमी करताना संघटनेची संमती घेतली जात नाही. संघटनेकडे हमालांच्या तक्रारी आल्या तर संघटना तडजोडीतून हा प्रश्न सोडविते. तसेच, लेव्ही न भरण्याचे प्रकारसुद्धा मालकांकडून होतात. या संदर्भात संघटनेचे ४० सभासद वाहतूक विभागामध्ये काम करत असता मालक लेव्ही भरत नसत. संघटनेने याविषयी औद्योगिक-कामगार न्यायालयात दावा दाखल केला आहे. परंतु सहा वर्षांच्या प्रयत्नानेही दावा निकालात

...१४/-

निघू शकला नाही.

नुकसान भरपाईच्या संदर्भात असे आढळले की, व्यापारी, मालक नुकसान भरपाई देतात. तडजोडीने हा प्रश्न सोडविला जातो. वेळेच्या संदर्भात संघटना पदाधिका-यांचे लक्ष वेधले असता कामाच्या वेळेच्या बाबतीत तडजोड ही करावी लागते, कारण हमालांना काम व वेतन यांची नितांत आवश्यकता असते. माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ हमालांच्या हिताकडे दुर्लक्ष करते, असे मत संघटना पदाधिका-यांनी प्रतिपादन केले.

संघटनेचे विधायक उपक्रम :-

संघटनेने पतपेढी व गृहबांधणी असे दोन प्रकल्प हाती घेतले होते. परंतु, कायदेशीर अटींच्या अडचणीमुळे याबाबतीत संघटनेला अपयश आल्याचे पदाधिका-यांनी सांगितले.

संघटनेचे भावी धोरण व उपक्रम :-

व्यसनाधीनता, दारिद्र्य व निरक्षरतेमुळे कुटुंबनियोजनाचा अभाव आणि शारीरिक कष्टामुळे हमाल उतारवयात निराधार बनतात, त्यासाठी निवृत्तीवेतन सुरु करण्याची गरज आहे. परंतु संघटनेकडे कार्यकर्त्यांची उणीव असलेने कुठल्याच प्रकारचे भावी उपक्रम अथवा धोरण नसल्याचे त्यांनी सांगितले.

[३] हमाल पंचायत :-

संघटनेचे सेक्रेटरी श्री. बी.जी. चौगुले यांनी संघटनेविषयी पुढील माहिती दिली.

स्थापना :-

हिंद मजदूर संघ प्रणित "हमाल पंचायत" संघटनेची स्थापना १९९१ साली झाली. संघटनेची उभारणी कोल्हापूर जिल्हा हमाल संघाच्या फुटीतून झाली. कोल्हापूर जिल्हा हमाल संघामध्ये हमालांच्या हिताकडे झालेले दुर्लक्ष, मालक धार्जिण धोरण, दरवाढीचा परस्पर करार, पतपेढीसाठी जमा केलेली वर्गणी परत न करणे इ. कारणांमुळे काही हमाल कोल्हापूर जिल्हा हमाल संघातून बाहेर पडले. डॉ. बाबा आढाव व सांगली हमाल पंचायतचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब मगदूम यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली "हमाल पंचायत" संघटनेची स्थापना केली. परंतु कामगारांना फूस लावणे, मालकांचा दबाव, जुन्या संघटना पदाधिका-यांनी निर्माण केलेले अडथळे अशा अडचणींना तोंड देत हमालांना विश्वासात घेऊन संघटनेची उभारणी केली. प्रथम ४५० हमाल संघटनेचे सभासद होते. आज ६०० हमाल संघटनेचे सभासद आहेत. धान्यबाजार, वाहतूक तसेच शेतीविभागातील कांदा, बटाटा दुकानातील व गुदामातील हमाल संघटनेचे सभासद आहेत. विशेष म्हणजे, संघटनेचे सर्व संचालक हमाल आहेत.

...९६/-

संघटना कार्य :-

संघटना स्थापनेपूर्वी पाच वर्षे हमालांना दरवाढ मिळाली नव्हती. संघटना स्थापनेनंतर व्यापारी प्रतिनिधी व प्रशासकिय अधिकारी यांच्याशी करार होऊन २ वर्षांनी दरवाढ करण्याचे ठरले. त्याप्रमाणे १९९१ साली संघटनेने दरवाढ करवून घेतली. प्रत्यक्षात ६० टक्के दरवाढीची मागणी होती, परंतु, ३० टक्के दरवाढ झाली. त्यानंतर १९९३ साली दुस-या दरवाढीसाठी करार झाला. यानुसार २५ टक्के दरवाढ झाली. प्रत्यक्षात संघटनेची मागणी ८० टक्के दरवाढीची होती. याबरोबरच धान्यबाजारामधील स्त्री हमालांच्या समान व योग्य वेतनासाठी प्रयत्न केले. परंतु संबंधित मालक वर्गाने स्त्री हमालांना संघटनेचे सदस्यत्व रद्द करावयास भाग पाडले. त्यामुळे मालकवर्गाच्या दबावाने धान्यबाजारमधील स्त्री हमालांचा प्रश्न अनिर्णित राहिला आहे. तसेच तीन व्यापा-यांनी पाच वर्षे मंडळाकडे लेव्ही भरली नव्हती. संघटनेच्या प्रयत्नांमुळे चर्चेनंतर व संघर्षानंतर तीन वर्षांची लेव्ही मंडळाकडे भरणे व्यापा-यांना सक्तीचे केले.

हमाल - मालक परस्परसंबंधाबाबत असे आढळून आले की हमालांना मारहाणीचे, विनामोबदला काम करून घेण्याचे प्रकार घडत असत. परंतु संघटनेने संघटित शक्तीच्या दबावाखाली व्यापारी, मालक यांना पूर्वीचे धोरण बदलावयास भाग पाडले. परंतु आजही काही ठिकाणी असे प्रकार घडतात. हमाल आर्थिक कोंडीमुळे या विरोधात तक्रार करीत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी संघटना

काही करू शकत नाही. मालकांच्या सुद्धा हमालांविषयी तक्रारी येतात. परंतु त्या खोटया किंवा जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या असतात असे संघटनेचे पदाधिकारी सांगतात. सावकारीच्या माध्यमातून हमालांना कहयात ठेवण्याचे प्रयत्न क्वचित व्यापा-यांकडून घडतात. मात्र संघटना याबाबतीत काम व कर्ज यांची परस्पर फारकत करावयास व्यापारांवर दबाव आणून असे प्रश्न सोडविते.

कामाच्या वेळेच्या बाबतीत संघटनेचे पूर्णत: भिन्न मत आहे. माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ व व्यापारी यांचे संबंध परस्पर हीत जपणारे असल्याने वेळेबाबतचे करार होऊन सुद्धा मंडळाने सदरचा आदेश, सूचना व्यापा-यांना दिल्या नाहीत. त्यामुळे याप्रश्नाबाबतीत आजही संघटनेचा संघर्ष चालू आहे.

या कार्याबरोबरच शहरामधील हातगाडी व छकडे चालविणारे हमाल यांना संघटित करण्याचा प्रयत्न संघटनेने केला, परंतु, जुने हमाल आर्थिक हितसंबंध व व्यक्तिगत व्यवसाय चालावा या हेतूने या प्रयत्नांपासून अलिप्त राहिले. त्यामुळे याबाबतीत संघटना यशस्वी होऊ शकली नाही.

वरीलप्रमाणे काम, वेतन याबाबतीत संघटना प्रयत्नवादी असली तरी हमालांना पूर्ण विचार नसलेने व आर्थिक दारिद्र्यामुळे वेतनवाढीबाबत व पूर्ण वेतन मिळणेबाबत संघर्षास हमालांचा विरोधही असतो. परंतु दरवाढीच्या संदर्भातले निर्णय प्रथम संघटनेत चर्चेने घेतले जातात व नंतरच करार केला जातो.

संघटनेचे विधायक उपक्रम :-

संघटनेची कारकीर्द अल्प झालेली असलेने फारसे विधायक उपक्रम संघटना राबवू शकली नाही. हमालांचे प्रबोधन व्हावे या दृष्टिकोनातून व्यसनमुक्ती, बचत, साक्षरता इत्यादी विषयावर चर्चासत्रे संघटनेने आयोजित केली आहेत.

संघटनेचे भावी उपक्रम व धोरण :-

पुणे हमाल पंचायतीचा आदर्श ठेवून हमालांसाठी "कष्टाची भाकर", पतपेढी, गृहबांधणी योजना हे विधायक उपक्रम राबविण्याची संघटनेची आकांक्षा आहे. तसेच हमालांना संघटित करणेसाठी व त्यांच्यामधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी शिबिरे आयोजित करणे, असा संघटनेचा भावी उपक्रम आहे. काम व वेतन याबाबत अपूर्ण व अनिर्णित प्रश्न, लेव्ही प्रमाण ४० टक्के, दरवाढ १ वर्षाने इ. प्रश्न सोडविण्यास संघटना प्राधान्य देईल. त्यासाठी माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचे सहकार्य आवश्यक आहे, असे संघटना पदाधिका-यांचे मत होते.

थोडक्यात, वरील प्रमाणे कोल्हापूरमध्ये तीन संघटना कार्यरत आहेत. तिन्ही संघटना हमाली क्षेत्रातच काम करत असल्या तरी त्यांच्या मध्ये संघर्ष येत नाही. अलग व अलिप्त पद्धतीने त्यांचे कामकाज चालते. संघटनेचे भावी उपक्रम व धोरण पाहता "हमाल पंचायत" ही संघटना वगळता इतर संघटनांकडे निश्चित असे धोरण नाही. दरवाढीच्या

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

...१९/-

संदर्भात, दरवाढ १ वर्षानि असावी याबाबतीत सर्वच संघटना आग्रही आहेत, परंतु प्रयत्नात नाहीत. हमाल पंचायत वगळता इतर संघटना जुन्या आहेत. परंतु, माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या स्थापनेनंतर त्यांचे कार्य असमाधानकारक असल्याचे मत हमालांनी व्यक्त केले. वास्तविक पाहता प्रशासकीय तरतुदी, कायदे यापेक्षा संघटना हेच माध्यम हमालांच्या उन्नतीसाठी प्रभावी ठरते. कारण कामावर आधारित वेतन व काम अनियमित यामुळे संघटनेचे विधायक उपक्रमच अधिक उपयुक्त ठरतात. पुण्याची "हमाल पंचायत" हे याचे एक वास्तव उदाहरण. या दृष्टीकोनातून कोल्हापूर शहरामध्ये संघटनेच्या माध्यमातून अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

## कोल्हापूर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ -

मंडळाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मंडळाच्या कार्याविषयी व यंत्रणेविषयी पुढीलप्रमाणे माहिती दिली :-

"महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे कल्याण व नियमन]" कायदा १९६९ अन्वये कोल्हापूरमध्ये १९८५ साली कोल्हापूर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना झाली. कामगारांचे वेतन, कामाचे स्वरूप व कल्याणकारी योजना यासाठी तरतूद करणे हे मंडळाचे कार्य आहे. आज हमालांचे वेतन, व्यापारी व मालक मंडळाकडे जमा करतात, नंतर बँकेमधून हमालांना वेतन मिळते. तसेच जमा होण्याऱ्या वेतनावरती व्यापाऱ्यांकडून ५० टक्क्यांपर्यंत लेव्ही

जमा करून घेण्याचे अधिकार मंडळास आहेत. आज व्यापारी व मालक २८टक्केलेव्ही जमा करतात. २८ टक्के लेव्ही मधून ३.४० टक्के रक्कमेमधून मंडळाचा प्रशासकीय खर्च चालविता जातो. तसेच २९.७५ टक्के भविष्य-निर्वाहनिधीसाठी जमा होतात. यामध्येच सेवानिवृत्तीची रक्कम १०.७१ टक्के जमा केली जाते. २९.७५ टक्के दिवाळी भेट [बोनस] प्रत्येक वर्षी दिली जाते. पगारी सुट्टी व रजेचा पगार यासाठी अनुक्रमे ३.५७ टक्के व ७.१९ टक्केची तरतूद आहे. ही रक्कम दिवाळी भेटमधून प्रत्येक वर्षी दिली जाते. नुकसान भरपाईसाठी ३.५७ टक्के तरतूद आहे. वैद्यकिय मदतीसाठी १.७८ टक्के तरतूद आहे. कल्याणनिधीसाठी ०.३२ टक्के रक्कम राखीव असते. यामधून आजअखेर पुस्तकपेढीचा उपक्रम राबविला आहे. ५० टक्केपेक्षा अधिक गुण असणा-या हमालाच्या एका मुलास पाठयपुस्तके भेट दिली जातात. परंतु प्रशासकीय अधिका-यांच्या मता-नुसार, ही तरतूद हमालांची संख्या लक्षात घेता अल्प आहे. दरवाढी-संदर्भाचे निर्णय व्यापारी प्रतिनिधी व संघटना प्रतिनिधी यांच्याशी झालेल्या करारातून घेतले जातात. परंतु दरवाढीच्या कालावधी संबंधी कायदयाची निश्चित अट नाही. या बाबी पूर्णत: होणा-या करारा-वर अवलंबून असतात. हमाल व मालक यांच्या परस्पर तक्रारी विषयी विचारणा करता, हमालांच्या तक्रारी वेतन, लेव्ही इत्यादी विषयी असतात. परंतु तक्रारी तोंडी स्वरूपात असल्याने प्रश्न तडजोडीने सोडवावे. लागतात. मालकांच्या हमालांविषयी फारशा तक्रारी नसतात. हमालां साठी अधिक कल्याणकारी योजना राबविण्यासाठी मंडळाच्या अधिकारांची व्याप्ती वाढविली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

...१०१/-

सारांश, हमाल संघटनांच्या संघटित प्रयत्नामुळे हमालांचे काही प्रश्न सुटले आहेत :- [१] कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाच्या स्थापनेनंतर हमालांची वेतन कपात, [२] कामाच्या संबंधातील मुकादम, हुंडेकरी यांचा हस्तक्षेप संपुष्टात आला आहे आणि [३] रुपयास ८. ३३ पैसे इतक्या भविष्यनिर्वाह-निधीची सुविधा हमालांना उपलब्ध झाली आहे.

वरील प्रमाणे हमालांचे काही प्रश्न मार्गी लागले असले तरी काही समस्या आजही आहेत : [१] वेतनवाढ नियमित व दरवर्षी न मिळणे [२] पगारी रजा, आजारी रजा, नुकसान भरपाई, पगारी सुट्टी हमालांना न मिळणे [३] कामाच्या ठिकाणच्या सोयी सुविधांचा विचार करता विश्रांतीगृह, स्वच्छतागृह, प्रथमोपचार याबाबत सुधारणांचा अभाव असणे [४] हमालांची एखाद्या ठिकाणची नेमणूक कायमस्वरूपी नसणे [५] संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे अडचणीच्या वेळी आकस्मिक निधी कर्ज रूपाने हमालांना न मिळणे [६] हमालांच्या कामाची वेळ निश्चित न ठरणे इत्यादी.